# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३५७ - २३ दिनांक : - १५/१०/२०२३

**पोलीस कोठडीत असतांना रुग्णालय परिसरातुन पळुन जाणा-या आरोपीत पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.**

दिनांक ०३/१०/२०२३ रोजी सकाळी ०७:०० वा. सुमारास अंबेमाता मंदीरामध्ये बॅग चोरी केल्या प्रकरणी विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ९३९/२०२३, भा.द.वी.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्ह्यतील सहभाग निष्पन्न झाल्याने मंगेश ऊर्फ मनिष यशवंत पार्टे, रा. मनवेलपाडा, विरार (पू.) या आरोपीला दिनांक ०५/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. दिनांक ०८/१०/२०२३ रोजी आरोपी यास नियमीत वैद्यकीय तपासणी करीता चंदनसार येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आलेले असताना, पोलीस गार्डच्या हाताला झटका देऊन तो पोलीसांच्या कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला. त्याबाबत विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ९६४/२०२३ भा.द.वी.सं. कलम २२४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर घटनेची मा. वरिष्ठ अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन आरोपीला अटक करण्याचे आदेश दिले. त्या प्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ मार्फत पोलीस पथक तयार करण्यात आले. आरोपी पळून गेल्या नंतर तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपणीय माहितीव्दारे दिनांक १४/१०/२०२३ रोजी आरोपी मंगेश ऊर्फ मनिष यशवंत पार्टे, वय ४८ वर्षे, रा. ई/१७, केशव स्वप्न अपार्टमेंट, मनवेल पाडा रोड, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास पो.नि. अनिल कदम बोरिवली रेल्वे यांच्या पथकाच्या मदतीने बोरीवली रेल्वे स्थानक परीसरातून ताब्यात घेण्यात आले.

आरोपी मंगेश ऊर्फ मनिष यशवंत पार्टे याने पोलीसांच्या कायदेशीर रखवालीतून पळून गेल्यानंतर दिनांक ०९/१०/२०२३ रोजी ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाची बॅग चोरल्याबाबत बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे गु.नों.र.क्र.१२८०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या अधिक तपासामध्ये आरोपी याने दादर, माहिम, अंधेरी, केळवा इ. रेल्वे स्थानकांमध्ये तसेच चालू ट्रेनमध्ये बॅग लिफ्टींग व मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीत मंगेश ऊर्फ मनिष यशवंत पार्टे याचा पुर्वईतिहास पडताळुन पाहता त्याचे वर खुन व चोरीचे गुन्हे नोंद आहे. उक्त आरोपीत यास पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजीत टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब. प्रविण वानखेडे सागर सोनावणे, नेम- गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम- सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

----0000----